दैनिक
# तेरणा वृत्तांत

धाराशिव • पृष्ठे : ४ • अंक : ५२ • किंमत : ₹ ५ • वर्ष : १ रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ RNI NO. MHMAR/25/A0338 • epaper.ternavruttant.com

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची चौथी यादी जाहीर

## एकापेक्षा अधिक बँकांत कर्जखाती असलेल्या १ लाख १५ हजार ६९७ शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध

**मुंबई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, एकापेक्षा अधिक बँकांमध्ये कर्जखाती असलेल्या आणि २ लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या १ लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांची चौथी यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.**



सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, महाआयटीने तयार केलेल्या योजनेच्या पोर्टलवर बँकांनी एकूण ३१.१७ लाख थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. महाआयटीने केलेल्या संगणकीय प्रक्रियेनंतर, आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांपैकी १५.८५ लाख पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यांवर आतापर्यंत १३ हजार २७५ कोटी रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे.

पहिल्या यादीत १६ लाख ९६ हजार २०१, दुसऱ्या यादीत ४ लाख १९ हजार ७३७ आणि तिसऱ्या यादीत ३ लाख ५१ हजार १९२, अशा एकूण २४ लाख ६७ हजार १३० पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या आहेत. आज एकापेक्षा अधिक बँकांमध्ये कर्जखाती असलेल्या आणि २ लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या १ लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ही यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे.

या यादीमध्ये एकापेक्षा अधिक बँकांकडून पीककर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या यादीतील शेतकऱ्यांच्या कर्जथकबाकीची रक्कम ३१ मार्च २०२६ रोजीची आहे. १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आणि इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत.

शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीच्या कर्जथकबाकीची खातरजमा करून नजीकच्या आपले सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करावे.

या यादीतील राष्ट्रीयीकृत आणि व्यापारी बँकांशी संबंधित काही शेतकऱ्यांची ३१ मार्च २०२६ रोजीची कर्जथकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त असली, तरी शासनाच्या 'हेअरकट' धोरणानुसार ही सर्व कर्जे निरंक करण्यात येणार आहेत.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांपैकी मृत, तसेच वयोवृद्ध आणि बोटांच्या ठशांची नोंद होत नसलेल्या लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यासाठी १९ ऑगस्ट २०२६ रोजी मानक कार्यप्रणाली (एसओपी) निर्गमित करण्यात आली आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर जमा करण्यात येणार आहे.

## भ्रष्टाचाराबाबत जनजागृतीसाठी २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान दक्षता जनजागृती सप्ताह

**मुंबई :** भ्रष्टाचारामुळे समाजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दक्षता जनजागृतीसारखे उपक्रम नियमितपणे राबविले पाहिजेत. भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग असणे गरजेचे आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केल्यानुसार राज्यामध्ये २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

कोणताही राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचार करताना किंवा भ्रष्टाचारात गुंतलेला आढळल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई येथे संपर्क साधावा. तसेच टोल फ्री क्रमांक १०६४, दूरध्वनी क्रमांक ०२२-२४९२१२१२, २४९२२६१८, संकेतस्थळ https://acb.maharashtra.gov.in, ई-मेल acbwebmail@mahapolice.gov.in, addlcpacbmumbai@mahapolice.gov.in आणि व्हॉट्सअॅपक्रमांक८८२८२४१०६४यांवर संपर्क साधावा, असे आवाहन संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी केले आहे.

## २६ ते ३० ऑक्टोबरदरम्यान उजनीच्या मुख्य जलवाहिनीची दुरुस्ती

■ सोमवारपासून पाच दिवस शहराचा पाणीपुरवठा राहणार बंद



**धाराशिव :** धाराशिव शहराचा पाणी पुरवठा सोमवार (दि. २६ ऑक्टोबर) ते शुक्रवार (दि. ३० ऑक्टोबर) दरम्यान बंद राहणार आहे. उजनी धरणातून धाराशिव शहराकडे येणाऱ्या मुख्य जलवाहिनीतील गळती काढण्यासाठी दुरुस्तीचे काम करण्यासाठी पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती नगरसेवक तथा धाराशिव नगरपरिषदेचे पाणीपुरवठा सभापती विलास लोंढे यांनी दिली आहे.

या दुरुस्तीच्या कामामुळे शहराला होणारा संपूर्ण पाणीपुरवठा बंद राहणार आहे. सर्व नागरिकांनी जपून व गरजेइतकेच पाणी वापरावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

## नळदुर्गजवळ पायी जाणाऱ्या नागरिकांना कंटेनरची धडक; एकाचा मृत्यू, सहा जखमी

■ मुर्टा साठवण तलावाजवळील पुलानजीक अपघात

■ कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**नळदुर्ग :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील मुर्टा साठवण तलावाच्या सांडव्यावरील पुलाजवळ पायी जाणाऱ्या नागरिकांना भरधाव कंटेनरने धडक दिल्याची घटना शुक्रवारी (दि. २३ ऑक्टोबर) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात गुरुसिद्धप्पा बाबू कुंभार (वय ३१, रा. बसवकल्याण, जि. बिदर, कर्नाटक) यांचा मृत्यू झाला असून, अन्य सहा जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संगमेश बस्वराज बेलुरे, गुरुसिद्धप्पा बाबू कुंभार, वीरेश हणमंत कुंभार, वीरेश रुद्रमणी चौधरी, रोहन दशरथराव हंचाटे, महादेव रामलिंगय्या मठपती (सर्व रा. सुभाष चौक, बसवकल्याण, जि. बिदर) आणि मडीवाळप्पा चंद्रकांत जमादार (रा. तिपरांत, ता. बसवकल्याण) हे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील बायपास रस्त्याने पायी जात होते.

मुर्टा साठवण तलावाच्या सांडव्यावरील पूल ओलांडून रस्त्याच्या डाव्या बाजूने जात असताना कंटेनर क्रमांक एमएच ०४ एनबी ९६७१ ने त्यांना धडक दिली. या अपघातात गुरुसिद्धप्पा कुंभार गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला, तर अन्य सहा जण जखमी झाले.

याप्रकरणी जखमी संगमेश बेलुरे यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार कंटेनर चालक देवेंद्र लेढा चौव्हाण (रा. घटबेहटी, जि. बदायूं, उत्तर प्रदेश) याच्याविरुद्ध हयगयीने व निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब), १०६ (१) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## तुळजापूरच्या सिद्धार्थ शिंगाडेंच्या कलेला राष्ट्रीय सन्मान!

■ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय ललित कला पुरस्कार प्रदान

**तुळजापूर :** तुळजापूरच्या मातीत घडलेले चित्रकार सिद्धार्थ शिंगाडे यांनी आपल्या चित्रकलेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या ललित कला अकादमीच्या प्रतिष्ठित राष्ट्रीय ललित कला पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे तुळजापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तुळजापूर नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळा क्रमांक २ मध्ये शिक्षण घेतलेल्या सिद्धार्थ शिंगाडे यांनी चित्रकलेच्या क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आपल्या कलासाधनेच्या बळावर त्यांनी राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवले असून, त्यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले.

नवी दिल्लीतील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. सिद्धार्थ शिंगाडे यांच्या या यशामुळे धाराशिव जिल्ह्याच्या कलाक्षेत्राच्या लौकिकात भर पडली असून, त्यांच्या पुढील कलाप्रवासासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# चिंचपूरच्या शेतात गोवा बनावटीच्या मद्याचा साठा जप्त; ७.९२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**भूम : परंडा तालुक्यातील चिंचपूर (बु.) येथील तलावाशेजारील शेतात साठवून ठेवलेल्या गोवा बनावटीच्या देशी व विदेशी मद्याचा मोठा साठा राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला आहे. शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत तब्बल ७ लाख ९२ हजार रुपये किमतीचा मद्यसाठा हस्तगत करण्यात आला. महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेल्या या मद्यसाठ्याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी फरार आहेत.**



राज्यात अवैध मद्याची आयात, वाहतूक, साठवणूक आणि विक्री रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांच्या आदेशानुसार तसेच संचालक (अंमलबजावणी व दक्षता) प्रसाद सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव जिल्ह्यात ही मोहीम सुरू आहे. या मोहिमेदरम्यान भूम येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाला चिंचपूर (बु.) येथील तलावाशेजारील शेतात गोवा बनावटीच्या मद्याचा साठा असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला असता मोठ्या प्रमाणावर देशी व विदेशी मद्याचा साठा आढळून आला.

या कारवाईत गोवा बनावटीच्या 'ढोकी संत्रा' देशी दारूच्या ९० मिलिलिटर क्षमतेच्या १७ हजार ७०० सीलबंद बाटल्या असलेले १७७ बॉक्स जप्त करण्यात आले. याशिवाय 'रॉयल स्टॅग' व्हिस्कीच्या १८० मिलिलिटर क्षमतेच्या ३३६ बाटल्या असलेले सात बॉक्सही हस्तगत करण्यात आले. जप्त केलेल्या संपूर्ण मद्यसाठ्याची किंमत ७ लाख ९२ हजार रुपये असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली.

### अवैध मद्याबाबत माहिती देण्याचे आवाहन

अवैध मद्याची निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री किंवा साठवणूक होत असल्याची माहिती नागरिकांना मिळाल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १८०० ८३३ ३३३३ या टोल फ्री क्रमांकावर अथवा नजीकच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे. माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम ६५ (अ), ६५ (ई), ८१, ८३ आणि ९० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा मद्यसाठा शेतात कोणी आणला, त्याची साठवणूक कोणाच्या सांगण्यावरून करण्यात आली आणि त्याची विक्री कुठे केली जाणार होती, याचा तपास सुरू आहे. फरार आरोपींचाही शोध घेण्यात येत आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे धाराशिव जिल्हा अधीक्षक हर्षवर्धन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत भूमचे निरीक्षक एच. बी. लांडे, दुय्यम निरीक्षक बी. ए. राख, वाय. ए. कस्तुरे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक ए. बी. कोरे तसेच जवान ए. एन. कोळी, ए. एच. गवारी आणि आर. आर. कदम यांनी सहभाग घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक बी. ए. राख करीत आहेत.

# आयुर्वेदाच्या संशोधनाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड

- धाराशिवमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात
- शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात 'डिकोडिंग आयुर्वेदा विथ एआय' विषयावर मंथन
- ३०० हून अधिक प्राध्यापक, विद्यार्थी व संशोधकांचा सहभाग

धाराशिव : भारतीय पारंपरिक चिकित्सा पद्धती असलेल्या आयुर्वेदाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन अधिक प्रभावी करण्याच्या नव्या शक्यतांवर धाराशिवमध्ये राष्ट्रीय स्तरावर विचारमंथन झाले. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) साहाय्याने आयुर्वेदातील अध्यापन, संशोधन, रुग्णपरीक्षण, निदान आणि चिकित्सकीय निर्णय प्रक्रियेत कोणते सकारात्मक बदल घडविता येऊ शकतात, यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, धाराशिव येथे ९ व १० ऑक्टोबर रोजी आयोजित "Artificial Intelligence in Healthcare - Decoding Ayurveda with AI' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ३०० हून अधिक प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी, पीएच.डी.संशोधक, शिक्षक आणि आयुर्वेद क्षेत्रातील अभ्यासकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाच्या कायचिकित्सा विभागाच्या वतीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, मुंबई यांच्या मान्यतेने या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. आयुर्वेदासारख्या प्राचीन चिकित्सा पद्धतीतील ज्ञानाचा आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक प्रभावी उपयोग कसा करता येईल, तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून आयुर्वेद शिक्षण आणि संशोधनाच्या नव्या दिशा कशा विकसित करता येतील हा या चर्चासत्राचा प्रमुख उद्देश होता.

चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ढेंगळे पाटील उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. वीणा पाटील होत्या. या दोन दिवसीय चर्चासत्रात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. गणेश करंजखेडे आणि डॉ. संदीप काळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी डॉ. गणेश करंजखेडे यांनी "Developing AI A{{lications for Ayurveda - A Domain Perspective' आणि "AI Applications in Ayurved Education and Research' या विषयांवर सविस्तर व्याख्याने दिली. आयुर्वेद क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विविध अनुप्रयोग विकसित करण्याच्या शक्यता, आयुर्वेदातील ज्ञानसंपदेचे डिजिटल माध्यमातून विश्लेषण, तसेच अध्यापन आणि संशोधनात एआयचा संभाव्य वापर याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. संदीप काळे यांनी "Digital Ayurveda: Essential AI Tools for Ayurveda Faculty' AmpU "AI in Ayurvedic Clinical Practice: From Rogi Pariksha to Clinical Decision Support' या विषयांवर मार्गदर्शन केले. आयुर्वेदातील प्राध्यापकांसाठी उपयुक्त ठरू शकणारी डिजिटल साधने, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शैक्षणिक कार्य अधिक परिणामकारक करण्याच्या शक्यता, तसेच रुग्णपरीक्षणापासून चिकित्सकीय निर्णय प्रक्रियेपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेचा सहाय्यक साधन म्हणून कसा उपयोग करता येऊ शकतो, या विविध पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला.

या व्याख्यानांच्या माध्यमातून आयुर्वेदातील पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समन्वय साधण्याच्या विविध शक्यता सहभागींसमोर मांडण्यात आल्या. आयुर्वेदातील अध्यापन, संशोधन, निदान आणि चिकित्सकीय निर्णय प्रक्रियेत एआयच्या संभाव्य उपयोगांवर विशेष भर देण्यात आला. आधुनिक डिजिटल साधनांच्या मदतीने आयुर्वेदातील संशोधनाला नवी दिशा देण्याच्या संधींची माहिती सहभागी प्राध्यापक, विद्यार्थी आणि संशोधकांना मिळाली.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पदव्युत्तर विद्यार्थी, पीएच.डी. संशोधक आणि शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या शोधनिबंध व पोस्टर सादरीकरण स्पर्धा होय. या स्पर्धांना सहभागींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संशोधक आणि शिक्षकांना आपले संशोधन, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि वैज्ञानिक दृष्टिकोन मांडण्यासाठी या स्पर्धांच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध झाले. आयुर्वेद आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या समन्वयातून संशोधनाच्या नव्या दिशा शोधण्यास या उपक्रमामुळे प्रोत्साहन मिळाले.

शोधनिबंध आणि पोस्टर सादरीकरणाच्या माध्यमातून सहभागी विद्यार्थ्यांना आपले संशोधनकार्य इतर अभ्यासकांसमोर मांडण्याची संधी मिळाली. तसेच संशोधनातील विविध संकल्पनांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अधिक व्यापक करण्यासाठी या स्पर्धा उपयुक्त ठरल्या. आयुर्वेदातील पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक संशोधन पद्धतींशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले

चर्चासत्राच्या निमित्ताने आयुर्वेद औषधी आणि आयुर्वेद क्षेत्रातील विविध औषधनिर्मिती कंपन्यांचे स्टॉलही उभारण्यात आले होते. हे स्टॉल उपस्थितांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. या स्टॉलच्या माध्यमातून विविध आयुर्वेदिक औषधे, औषधी उत्पादने आणि आयुर्वेदाशी संबंधित उपक्रमांची माहिती देण्यात आली. प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक आणि वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यासकांना आयुर्वेद औषधनिर्मिती क्षेत्रातील विविध उत्पादनांची माहिती जाणून घेण्याची संधी या प्रदर्शनामुळे उपलब्ध झाली.

या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामुळे सहभागी प्राध्यापक, विद्यार्थी आणि संशोधकांना ज्ञानाची देवाणघेवाण करण्याबरोबरच आधुनिक डिजिटल साधनांची माहिती घेता आली. आयुर्वेदाच्या विकासासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, याविषयी विविध संकल्पना समजून घेण्याची संधी मिळाली.

आयुर्वेदातील शिक्षण, संशोधन आणि चिकित्सकीय कार्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराच्या शक्यतांवर झालेल्या विचारमंथनामुळे सहभागी अभ्यासकांना नवीन विषयांचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

विशेषतः आयुर्वेदासारख्या प्राचीन चिकित्सा पद्धतीचा आधुनिक विज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानाशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने हे चर्चासत्र महत्त्वपूर्ण ठरले. पारंपरिक आयुर्वेद ज्ञानाचे जतन करतानाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्याच्या अभ्यासाला आणि संशोधनाला अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या विविध शक्यता या निमित्ताने अधोरेखित करण्यात आल्या.

या राष्ट्रीय चर्चासत्रात ३०० हून अधिक प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी, पीएच.डी.संशोधक, शिक्षक आणि आयुर्वेद क्षेत्रातील अभ्यासकांचा सहभाग, तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, शोधनिबंध व पोस्टर सादरीकरण स्पर्धा आणि आयुर्वेद औषधींचे प्रदर्शन यांमुळे हा उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरला.

# पोलीस स्मृती दिनानिमित्त शहीद जवान प्रभाकर गलांडे यांच्या कुटुंबीयांचा सन्मान

- भूम पोलिसांकडून निवासस्थानी भेट देऊन सन्मानपत्र प्रदान
- शहीद जवानांच्या बलिदानाप्रती व्यक्त केली कृतज्ञता



**भूम : पोलीस स्मृती दिनानिमित्त कर्तव्य बजावताना देशाच्या व जनतेच्या सुरक्षिततेसाठी प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद जवानांना अभिवादन करण्यात आले. यानिमित्त भूम पोलीस ठाण्याच्या वतीने शहीद पोलीस हवालदार प्रभाकर दशरथ गलांडे यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करून त्यांच्या बलिदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.**

२१ ऑक्टोबर रोजी साजऱ्या करण्यात येणाऱ्या पोलीस स्मृती दिनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या संकल्पनेतून आणि धाराशिव जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या सन्मानार्थ विशेष उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत भूम पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांनी शहीद पोलीस हवालदार प्रभाकर दशरथ गलांडे यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांनी गलांडे कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्याशी संवाद साधला. तसेच पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या स्वाक्षरीचे 'कृतज्ञतापूर्वक स्मरण' हे अधिकृत सन्मानपत्र कुटुंबीयांना प्रदान करून त्यांचा सन्मान केला.

कर्तव्य बजावताना शहीद झालेल्या जवानांचे बलिदान पोलीस दलासाठी सदैव प्रेरणादायी आहे. त्यांच्या त्यागाचे स्मरण करून कुटुंबीयांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करणे हे पोलीस दलाचे कर्तव्य आहे. शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी पोलीस दल सदैव खंबीरपणे उभे असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी भूम पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस अंमलदार मुल्ला, पोलीस अंमलदार यादव, डोके, नाईकवाडी यांच्यासह शहीद प्रभाकर गलांडे यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# २७ ऑक्टोबरला राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

- १ ते १९ वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप

धाराशिव : बालकांचे निरोगी बालपण, सुदृढ आरोग्य आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी त्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला विशेष महत्त्व आहे. आतड्यांतील जंतांच्या संसर्गामुळे बालकांमध्ये निर्माण होणारा रक्तक्षय, अशक्तपणा आणि कुपोषणाचा धोका कमी करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व पात्र बालकांना आणि किशोरवयीन मुला-मुलींना शाळा, अंगणवाडी केंद्रे आणि आरोग्य संस्थांच्या माध्यमातून जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत. मोहिमेच्या मुख्य दिवशी औषध घेऊ न शकलेल्या पात्र बालकांसाठी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी मॉप-अप दिन आयोजित करण्यात आला आहे.

बालकांचे आरोग्य सुदृढ राहावे, त्यांच्यातील रक्तक्षयाचे प्रमाण कमी व्हावे, शारीरिक वाढ योग्य प्रकारे व्हावी आणि बौद्धिक विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील एकही पात्र बालक या मोहिमेपासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या समन्वयातून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

लहान मुले आणि किशोरवयीन मुला-मुलींमध्ये आतड्यांतील जंतांचा प्रादुर्भाव झाल्यास त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. जंतांच्या संसर्गामुळे शरीराला आवश्यक असलेल्या पोषक घटकांचे शोषण कमी होते. परिणामी, रक्तक्षय, अशक्तपणा, भूक मंदावणे आणि शारीरिक वाढ खुंटणे यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. याचा बालकांच्या बौद्धिक विकासावर, एकाग्रतेवर आणि शैक्षणिक प्रगतीवरही परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे बालकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी नियमित जंतनाशक औषधोपचार महत्त्वाचे ठरतात.

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेच्या दिवशी जिल्ह्यातील सर्व पात्र बालकांना आणि किशोरवयीन मुला-मुलींना जंतनाशक औषधांचा लाभ देण्यात येणार आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळांमध्ये, तर अंगणवाडीत नोंदणीकृत बालकांना संबंधित अंगणवाडी केंद्रांमध्ये औषध देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शाळेत किंवा अंगणवाडीत न जाणाऱ्या पात्र बालकांनाही मोहिमेचा लाभ मिळावा, यासाठी आरोग्य संस्थांच्या माध्यमातून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या समन्वयातून पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शिक्षक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांच्या सहभागातून मोहिमेची माहिती पालकांपर्यंत पोहोचविण्यात येणार असून, जंतनाशक औषधोपचाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे.

जंतनाशक औषधोपचारामुळे आतड्यांतील जंतांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. त्यामुळे शरीराला आवश्यक पोषक घटकांचे शोषण सुधारण्यास हातभार लागतो. परिणामी, बालकांचे आरोग्य सुधारण्यास, शारीरिक वाढीस आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होऊ शकते. बालकांची शैक्षणिक प्रगती, एकाग्रता आणि बौद्धिक विकासासाठी त्यांचे आरोग्य चांगले असणे आवश्यक आहे. त्यामुळे पालकांनी या मोहिमेचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या पाल्यांना जंतनाशक औषधांचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

विशेष म्हणजे, २७ ऑक्टोबर रोजी मोहिमेच्या मुख्य दिवशी काही कारणास्तव जंतनाशक गोळी घेऊ न शकलेल्या पात्र बालकांसाठी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी मॉप-अप दिन आयोजित करण्यात आला आहे. एखाद्या बालकाला आजारपण किंवा इतर आरोग्यविषयक समस्या असल्यास औषध देण्यापूर्वी संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांचा सल्ला घ्यावा. आजारपणामुळे किंवा इतर कारणांमुळे मुख्य दिवशी औषध घेणे शक्य न झाल्यास आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार ३ नोव्हेंबर रोजी संबंधित शाळा, अंगणवाडी केंद्र किंवा आरोग्य संस्थेत जंतनाशक गोळी देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. पालकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी यांनी केले आहे.

# पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत जिल्ह्यात ६२.९४ टक्के मतदान

**१८,३४५ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क**

**धाराशिव :** लोकशाहीच्या प्रक्रियेत आपला सहभाग नोंदविण्यासाठी जिल्ह्यातील पदवीधर मतदारांनी उत्साहाने मतदानाचा हक्क बजावला. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ अंतर्गत जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत झालेल्या मतदानात एकूण ६२.९४ टक्के मतदानाची नोंद झाली.

जिल्ह्यातील २९ हजार १४५ नोंदणीकृत मतदारांपैकी १८ हजार ३४५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये १४ हजार ९५४ पुरुष आणि ३ हजार ३९१ महिला मतदारांचा समावेश आहे. पदवीधर मतदारांनी मतदानाच्या माध्यमातून लोकशाही प्रक्रियेतील आपला सहभाग अधोरेखित केला.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण ७६ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. जिल्ह्यात २२ हजार ७४५ पुरुष, ६ हजार ४०० महिला आणि इतर प्रवर्गातील शून्य असे एकूण २९ हजार १४५ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी १४ हजार ९५४ पुरुष आणि ३ हजार ३९१ महिला अशा एकूण १८ हजार ३४५ मतदारांनी मतदान केले. इतर प्रवर्गातील मतदानाची संख्या शून्य आहे. पुरुष मतदारांच्या मतदानाची टक्केवारी ६५.७५, तर महिला मतदारांच्या मतदानाची टक्केवारी ५२.९८ इतकी नोंदविण्यात आली. जिल्ह्यातील एकूण मतदानाची टक्केवारी ६२.९४ इतकी आहे.

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक ही सुशिक्षित मतदारांना लोकशाही प्रक्रियेत थेट सहभाग नोंदविण्याची महत्त्वपूर्ण संधी असते. शिक्षण, रोजगार, युवकांचे प्रश्न, उच्चशिक्षित तरुणांच्या अपेक्षा आणि पदवीधरांच्या विविध समस्यांना लोकशाहीच्या व्यासपीठावर प्रतिनिधित्व मिळावे, या दृष्टीने या निवडणुकीला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १८ हजार ३४५ पदवीधर मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीप्रती असलेली आपली बांधिलकी व्यक्त केली.

मतदानाच्या आकडेवारीवरून पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांचा सहभाग कमी असल्याचे दिसून येते. पुरुषांच्या मतदानाची टक्केवारी ६५.७५ असताना महिलांच्या मतदानाची टक्केवारी ५२.९८ इतकी राहिली. पुरुष आणि महिला मतदारांच्या मतदानाच्या टक्केवारीत १२.७७ टक्के गुणांचे अंतर आहे.

जिल्ह्यातील ७६ मतदान केंद्रांवर सकाळी ८ वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली होती. मतदानानंतर प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील एकूण २९ हजार १४५ नोंदणीकृत मतदारांपैकी १८ हजार ३४५ मतदारांनी मतदान केले, तर १० हजार ८०० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावलेला नाही. एकूण नोंदणीकृत मतदारांपैकी ६२.९४ टक्के मतदारांनी मतदानात सहभाग नोंदविला.

जिल्ह्यातील मतदानाच्या अंतिम आकडेवारीनुसार एकूण ७६ मतदान केंद्रांवर २२ हजार ७४५ पुरुष, ६ हजार ४०० महिला आणि इतर प्रवर्गातील शून्य असे एकूण २९ हजार १४५ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी १४ हजार ९५४ पुरुष आणि ३ हजार ३९१ महिला अशा एकूण १८ हजार ३४५ मतदारांनी मतदान केले. पुरुषांच्या मतदानाची टक्केवारी ६५.७५ आणि महिलांच्या मतदानाची टक्केवारी ५२.९८ अशी एकूण मतदानाची टक्केवारी ६२.९४ इतकी नोंदविण्यात आली आहे.

# सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीसाठी २६ नोव्हेंबरला मतदान

सोलापूर : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. एकूण १९ संचालकांच्या निवडीसाठी २६ ते ३० ऑक्टोबरदरम्यान उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. आवश्यकतेनुसार २६ नोव्हेंबरला मतदान होईल, तर २७ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. बँकेच्या संचालक मंडळाची मागील निवडणूक २०१५ मध्ये झाली होती. त्यानंतर २९ मे २०१८ रोजी संचालक मंडळ बरखास्त करून बँकेवर प्रशासक नियुक्त करण्यात आला होता. आता नव्या संचालक मंडळाच्या निवडीसाठी प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी २ नोव्हेंबरला होणार असून, ३ नोव्हेंबरला पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाईल. उमेदवारांना ३ ते १७ नोव्हेंबरदरम्यान अर्ज मागे घेता येतील. माघारीची मुदत संपल्यानंतर निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. मतदान आवश्यक असलेल्या जागांसाठी १८ नोव्हेंबरला निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे.

## कर्जवाटप प्रकरणातील अपात्रतेचा मुद्दा महत्त्वाचा :

बेकायदेशीर कर्जवाटप प्रकरणात कलम ८८ अन्वये तत्कालीन ३२ संचालकांना जबाबदार धरण्यात आले आहे. त्यापैकी आठ संचालकांचे निधन झाले असून, उर्वरित २४ संचालकांना ही निवडणूक लढवता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे या संचालकांच्या अपात्रतेचा मुद्दा निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

## १९ जागांची अशी आहे विभागणी

संचालक मंडळातील ११ जागा जिल्ह्यातील ११ तालुक्यांच्या विकास सोसायट्यांमधून भरल्या जाणार आहेत. उर्वरित आठ जागांमध्ये महिलांसाठी दोन जागा आहेत. अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती, पणन, दूध संस्था व इतर तसेच बँका-पतसंस्था या गटांतून प्रत्येकी एक संचालक निवडला जाणार आहे.

# दुष्काळावर मात करण्यासाठी कौडगावच्या श्यामल राठोड यांचा नाविन्यपूर्ण प्रयोग

- मातीविना हिरव्या चाऱ्याची निर्मिती
- मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांच्याकडून प्रकल्पाची पाहणी

धाराशिव : दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या धाराशिव जिल्ह्यात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना कौडगाव येथील प्रयोगशील महिला शेतकरी श्यामल राठोड यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आशेचा नवा मार्ग दाखविला आहे. शेतीसाठी मोठी जमीन नाही, मुबलक पाणीही नाही; तरीही जिद्द, कल्पकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर त्यांनी मातीविना हिरवा चारा तयार करण्याचा अभिनव प्रयोग यशस्वी केला आहे. हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अवघ्या सात ते आठ दिवसांत पौष्टिक हिरवा चारा तयार करणाऱ्या त्यांच्या प्रकल्पाची जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल त्यांनी श्यामल राठोड यांचे विशेष कौतुक केले.

धाराशिव जिल्ह्यात कमी पाऊस, पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीमुळे पशुधनासाठी वर्षभर हिरवा चारा उपलब्ध करून देणे हे शेतकरी व पशुपालकांसमोरील मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत कमी जागेत आणि अत्यल्प पाण्याचा वापर करून दर्जेदार व पौष्टिक चारा तयार करण्यासाठी हायड्रोपोनिक तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकते. याच तंत्रज्ञानाचा अवलंब करून कौडगाव येथील श्यामल राठोड यांनी स्वतःच्या पुढाकारातून हायड्रोपोनिक चारा निर्मिती युनिट उभारले आहे.

या प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी कौडगाव येथे भेट दिली. यावेळी पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. दीपक मुळे, पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ.वैभव पाटील आणि पशुधन



विकास अधिकारी नाथबुवा उपस्थित होते.

पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांनी हायड्रोपोनिक चारा निर्मिती प्रकल्पातील रॅकची रचना, चारा उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रे, बियाणे रुजविण्याची प्रक्रिया, पाण्याचे नियोजन आणि सात ते आठ दिवसांत तयार होणाऱ्या हिरव्या चाऱ्याची गुणवत्ता याबाबत सविस्तर माहिती घेतली. श्यामल राठोड यांनी प्रकल्पाची उभारणी, चारा उत्पादनाची पद्धत आणि प्रत्यक्ष कामकाजाची माहिती अधिकाऱ्यांना दिली.



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी श्यामल राठोड यांच्या प्रयोगशीलतेचे कौतुक करत कमी संसाधनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पशुधनासाठी हिरवा चारा उपलब्ध करण्याचा हा प्रयत्न प्रेरणादायी असल्याचे सांगितले. महिलांनी शेती आणि शेतीपूरक व्यवसायांमध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा स्वीकार करून स्वयंपूर्णतेच्या दिशेने वाटचाल करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचेही या पाहणीच्या निमित्ताने अधोरेखित झाले. या प्रकल्पाच्या माध्यमातून कमी जागेत अधिक प्रमाणात हिरवा चारा तयार करून जनावरांची दैनंदिन चाऱ्याची गरज भागविण्याच्या शक्यतांवर अधिकाऱ्यांनी चर्चा केली. सध्या सुरू असलेल्या युनिटची उत्पादनक्षमता वाढवून त्याचे अधिक विस्तृत आणि व्यावसायिक स्वरूपातील युनिटमध्ये रूपांतर कसे करता येईल, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हाडदळकर आणि उपस्थित तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

विशेषतः मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेली रॅक व ट्रेची रचना, शेडनेटचे योग्य व्यवस्थापन, तापमान नियंत्रण, पाण्याचा काटकसरीने वापर आणि चारा उत्पादनातील सातत्य या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जनावरांना नियमितपणे पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध व्हावा, यासाठी प्रकल्पाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने आवश्यक तांत्रिक बाबींची माहिती देण्यात आली.

हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे या पद्धतीत चारा तयार करण्यासाठी मातीची आवश्यकता नसते. विशिष्ट प्रकारच्या ट्रेमध्ये बियाण्यांची रुजवण करून नियंत्रित पाणीपुरवठा आणि योग्य वातावरणाच्या साहाय्याने हिरवा चारा तयार केला जातो. पारंपरिक चारा उत्पादनाच्या तुलनेत या पद्धतीत ९० टक्क्यांपर्यंत पाण्याची बचत होऊ शकते. त्यामुळे पाण्याची कमतरता असलेल्या भागातील पशुपालकांसाठी ही पद्धत विशेष उपयुक्त ठरू शकते

दैनिक तेरणा वृत्तांत

हे पत्र मालक, प्रकाशक व संपादक मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांचे करिता प्रसाद संजय पवार, राजस्व प्रिंटिंग प्रेस, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर, जि.सोलापूर ४१३००२ येथे मुद्रित केले व नरसिंह मंदिराजवळ, तेर, धाराशिव, महाराष्ट्र - ४१३५०९ येथे प्रकाशित केले. संपर्कासाठी : मो. ९९७५६५०३६३, इमेल - ternavruttant@gmail.com

Printed by Prasad Sanjay Pawar at Rajswa Printing Press, Budhwar Peth, Wadar Galli, Solapur, Dist. Solapur 413002, for the owner, publisher and editor Malhar Ranajagjitsingh Patil, published at Ter, near Narsingh Temple, Dharashiv, Maharashtra – 413509. RNI No. – MHMAR/25/A0338.

# निर्यातक्षम फळबागांच्या ऑनलाइन नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी घ्यावा पुढाकार

■ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सागर खटकाळे यांचे आवाहन

**धाराशिव :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादित केलेल्या दर्जेदार फळांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी, निर्यातीच्या संधी वाढाव्यात आणि शेतमालाला चांगला दर मिळण्यास मदत व्हावी, या उद्देशाने सन २०२६-२७ या वर्षासाठी ट्रेसिबिलिटीनेट अंतर्गत निर्यातक्षम द्राक्ष, आंबा, डाळिंब यांसह विविध फळबागा व भाजीपाला पिकांच्या ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी निर्धारित कालावधीत आपल्या निर्यातक्षम फळबागांची नोंदणी करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सागर खटकाळे यांनी केले आहे.

धाराशिव जिल्ह्यात मागील काही वर्षांत शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आंबा फळबागांची लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी व्यावसायिक दृष्टिकोनातून फळबागांची लागवड करीत असून, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून निर्यातक्षम दर्जाचे आंबा उत्पादन घेत आहेत.त्यामुळे जिल्ह्यातील आंबा उत्पादकांसह इतर फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने निर्यातक्षम बागांची नोंदणी महत्त्वाची ठरणार आहे.

सध्या जागतिक बाजारपेठेबरोबरच स्थानिक बाजारपेठेतील ग्राहकांमध्येही अन्नसुरक्षेबाबत जागरूकता वाढली आहे. विशेषतः फळे आणि भाजीपाल्यामधील कीटकनाशकांच्या उर्वरित अंशांबाबत ग्राहक अधिक सजग झाले आहेत. निर्यात होणाऱ्या कृषिमालाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि कीटकनाशकांच्या अवशेषांची निर्धारित मर्यादा यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात फळे आणि भाजीपाला युरोपीय देशांसह इतर देशांमध्ये निर्यात केला जातो. युरोपीय देशांनी कीटकनाशकांच्या उर्वरित अंशांबाबत कठोर अटी लागू केल्यामुळे निर्यातक्षम उत्पादनांची नोंदणी आणि त्यांच्या उत्पादन प्रक्रियेचा मागोवा घेणारी व्यवस्था आवश्यक ठरली आहे. याच पार्श्वभूमीवर सन २००४-०५ पासून राज्यात कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली ग्रेपनेट या ऑनलाइन कार्यप्रणालीद्वारे निर्यातक्षम द्राक्षबागांची नोंदणी करण्यात येत आहे. सन २०२६-२७ या वर्षासाठी नोंदणीची कार्यवाही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांच्या कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

ग्रेपनेट कार्यप्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर इतर फळे आणि भाजीपाला पिकांसाठीही स्वतंत्र ऑनलाइन नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये आंब्यासाठी मँगोनेट, डाळिंबासाठी अनारनेट, भाजीपाला पिकांसाठी व्हेजनेट, संत्रा, मोसंबी आणि लिंबू या लिंबूवर्गीय फळपिकांसाठी सिट्रसनेट, कांद्यासाठी ओनियननेट, केळी व इतर फळपिकांसाठी अदरफ्रुटनेट तसेच बिलवाईननेट या ऑनलाइन प्रणालींचा समावेश आहे.या सर्व प्रणालींच्या माध्यमातून निर्यातक्षम फळे आणि भाजीपाला पिकांची नोंदणी करण्याची सुविधा अपेडाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे निर्माण होणारे आरोग्यविषयक धोके लक्षात घेऊन केंद्र शासनाने 'सुरक्षित अन्न पिकवा' या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. फळे आणि भाजीपाल्यातील कीटकनाशकांचे अवशेष निर्धारित मर्यादेत राहावेत, यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.स्थानिक बाजारपेठेतील ग्राहकांनाही सुरक्षित अन्न उपलब्ध व्हावे, या उद्देशाने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने कीटकनाशकांच्या अवशेषांची कमाल मर्यादा अर्थात मॅक्सिमम रेसिड्यु लिमिट (एमआरएल) निश्चित केली आहे. त्यामुळे निर्यातक्षम उत्पादनासाठी गुणवत्तापूर्ण शेतीबरोबरच कीटकनाशकांचा योग्य आणि नियंत्रित वापर करणेही महत्त्वाचे आहे.

ग्रेपनेट कार्यप्रणालीवर द्राक्षबागेची नोंदणी करण्यासाठी संबंधित द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज, शेतदर्शक नकाशा, सातबारा उतारा, ८-अ उतारा आणि ५० रुपये नोंदणी शुल्कासह अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच द्राक्षबागांच्या नोंदणीचे दरवर्षी नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. त्यामुळे या पूर्वी नोंदणी केलेल्या द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनीही आपल्या बागांच्या नोंदणीचे वेळेत नूतनीकरण करून घ्यावे.

## ग्रेपनेटअंतर्गत नोंदणी १ नोव्हेंबरपासून सुरू

सन २०२६-२७ या वर्षासाठी विविध पिकांच्या निर्यातक्षम बागांची ऑनलाइन नोंदणी करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी ग्रेपनेट अंतर्गत नोंदणी १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मँगोनेट अंतर्गत नोंदणी १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू झाली असून, ती १ जानेवारी २०२७ पर्यंत सुरू राहणार आहे.डाळिंबासाठी अनारनेट, भाजीपाला पिकांसाठी व्हेजनेट, लिंबूवर्गीय फळपिकांसाठी सिट्रसनेट, बिलवाईननेट,कांद्यासाठी ओनियननेट आणि इतर फळपिकांसाठी अदरफ्रूटनेट या प्रणालींवरील ऑनलाइन नोंदणी वर्षभर सुरू राहणार आहे.

# आ. राजेंद्र राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त रातंजनमध्ये नेत्र तपासणी शिबीर

**बार्शी : ग्रामीण भागातील नागरिकांना नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध व्हावी आणि डोळ्यांच्या आजारांचे वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने रातंजन येथील भैरवनाथ मंदिरात नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात २२७ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४१ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करावी लागणार आहे.**



आमदार राजेंद्र राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त विश्वजित देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या आरोग्य उपक्रमाचे आयोजन केले होते. रातंजनसह परिसरातील नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.

ग्रामीण भागात डोळ्यांच्या तक्रारींकडे अनेकदा दुर्लक्ष होते. परिणामी, निदान आणि उपचारांना विलंब होण्याची शक्यता असते. ही गरज लक्षात घेऊन आयोजित शिबिरात नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. पुढील उपचार आणि शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांची यादीही या वेळी करण्यात आली.

शिबिरासाठी सोलापूर येथील शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाचे सहकार्य लाभले. डॉ. मंजिरी पाटील आणि श्रीनिवास साबळे यांनी योगदान दिले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना नेत्रआरोग्याविषयी माहिती आणि पुढील उपचारांची दिशा मिळाली.

या वेळी महेश बोधले, शाहूराजे निंबाळकर, विश्वजित देशमुख, डॉ. सुहास मोटे, प्रवीणसिंह देशमुख, व्यंकटेश ढेंगळे, संभाजी देशमुख आणि साहेबराव देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या यशस्वितेसाठी विक्रांत देशमुख, सत्यवान देशमुख, महेश देशमुख, श्रीनिवास खराडे, राजेंद्र देशमुख, ब्रह्मदेव नावे, प्रवीणसिंह देशमुख आणि ग्रामस्थांनी सहकार्य केले. वाढदिवसानिमित्त आरोग्यसेवेचा उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल ग्रामस्थांकडून आयोजकांचे कौतुक करण्यात आले.

# अश्लील चित्रीकरण व्हायरल करण्याची धमकी देत तरुणीवर लैंगिक अत्याचार!

■ लग्न करून धर्म स्वीकारण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोप

■ भूम पोलीस ठाण्यात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

भूम : एका २४ वर्षीय तरुणीशी शारीरिक संबंध ठेवून त्याचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केल्यानंतर ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. तसेच लग्न करून धर्म स्वीकारण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोपही पीडितेने केला आहे. याप्रकरणी २३ ऑक्टोबर रोजी भूम पोलीस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील तरुणाने पीडितेच्या घरी जाऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले व त्याचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केले. त्यानंतर संबंधित चित्रीकरण व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला लॉजवर नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

याशिवाय, यापुढे आपल्या सांगण्याप्रमाणे वागली नाहीस तसेच लग्न करून धर्म स्वीकारला नाहीस, तर संबंधित चित्रीकरण नातेवाइकांना पाठवून बदनामी करण्याची धमकी दिल्याचेही पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे.

या प्रकरणी पीडितेने २३ ऑक्टोबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भूम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(१), ६४(२)(एम), ६९, ३१८(४), ३१९, ३५१(२), ७८, ७९ तसेच महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ च्या कलम ९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# जिल्ह्यातील १५ हजार ८९१ असाक्षर देणार साक्षरतेची चाचणी

**धाराशिव :** शिक्षणाची संधी हुकली, म्हणून शिकण्याची उमेद संपत नाही. आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर अक्षरांची ओळख करून घेता येते आणि ज्ञानाच्या बळावर आत्मविश्वासाने पुढे जाता येते, हाच संदेश देणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत 'उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमां'तर्गत जिल्ह्यात रविवारी, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यांकन चाचणी आयोजित करण्यात आली आहे. या चाचणीसाठी जिल्ह्यातील १५ हजार ८९१ असाक्षर व्यक्तींची नोंदणी करण्यात आली असून, त्यामध्ये १० हजार ९९४ महिला आणि चार हजार ८९७ पुरुषांचा समावेश आहे.विशेष म्हणजे या चाचणीत महिलांचा सहभाग लक्षणीय असून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व्यक्तींना साक्षरतेच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे अशी माहिती जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (योजना) नागेश मापारी यांनी दिली.

देशातील १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील असाक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता विकसित करणे,त्यांना वाचन, लेखन आणि संख्याज्ञानाची ओळख करून देणे,तसेच दैनंदिन जीवनातील व्यवहार आत्मविश्वासाने करण्यास सक्षम बनविणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.विविध कारणांमुळे औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व्यक्तींना पुन्हा शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

वाचन आणि लेखनाची कौशल्ये आत्मसात केल्यामुळे दैनंदिन जीवनातील अनेक व्यवहार अधिक सुलभ होतात.स्वतःचे नाव लिहिणे,आवश्यक माहिती वाचणे, साधे हिशेब करणे आणि विविध सेवांचा लाभ घेताना आवश्यक बाबी समजून घेणे यांसारख्या गोष्टींसाठी साक्षरता महत्त्वाची ठरते.त्यामुळे केवळ अक्षरओळख करून देणे एवढ्यापुरताच हा उपक्रम मर्यादित नसून,असाक्षर व्यक्तींना स्वावलंबनाच्या दिशेने पुढे नेण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येत आहे.

या मूल्यांकन चाचणीसाठी रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत परीक्षा केंद्रे सुरू राहणार आहेत. प्रत्यक्ष चाचणीचा कालावधी तीन तासांचा असेल. दिव्यांग परीक्षार्थींना चाचणी सोडविण्यासाठी अतिरिक्त ३० मिनिटांचा वेळ देण्यात येणार आहे.त्यामुळे दिव्यांग व्यक्तींनाही आवश्यक सवलतीसह या मूल्यांकन प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

# दुष्काळग्रस्त भागातील बालकांच्या पोषणाकडे विशेष लक्ष

■ अंगणवाड्यांचा नियमित आढावा घेण्याचे मंत्री आदिती तटकरे यांचे निर्देश

■ मार्च २०२७ पर्यंत बालपोषण कृती आराखडा

■ गर्भवती माता, स्तनदा माता आणि कुपोषित बालकांसाठी विशेष उपाययोजना

**मुंबई :** राज्यातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी तसेच गर्भवती आणि स्तनदा मातांना पोषण व आरोग्यविषयक सुविधा अखंडितपणे उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. अंगणवाड्यांना दररोज भेट देऊन कामाचा आढावा घ्यावा आणि दुष्काळी परिस्थितीत अंगणवाड्या सुरू ठेवण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.



दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या या बैठकीत त्यांनी विविध जिल्ह्यांतील समस्या जाणून घेतल्या. यावेळी विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, सहसचिव वि. रा. ठाकूर, सहआयुक्त संगीता लोंढे, अवर सचिव सरदार उपस्थित होते. आयुक्त माधवी सरदेशमुख यांनी विभागाच्या कामकाजाचे सादरीकरण केले.

## कुपोषण रोखण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे निर्देश

दुष्काळी परिस्थितीत बालकांमध्ये मध्यम तीव्र आणि तीव्र कुपोषण वाढू नये, यासाठी सर्व संबंधितांनी जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडणे आवश्यक आहे. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वयाने काम करावे, असे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांनी सांगितले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, दुष्काळ जाहीर झालेल्या जिल्ह्यांनी कामाचा वारंवार आढावा घ्यावा. ज्या भागांमध्ये पाणीटंचाई अधिक आहे, तेथे पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधावा. पाणीपुरवठा आणि आरोग्य विभागाच्या मदतीने अंगणवाड्यांपर्यंत आवश्यक सुविधा पोहोचवाव्यात. स्थलांतरित कामगारांच्या कुटुंबांची माहिती घेऊन त्यांच्या बालकांचे शिक्षण आणि पोषणसेवा सुरू राहतील, यासाठी पालकांना मार्गदर्शन करावे. तसेच गर्भवती मातांना अखंडित सेवा देऊन त्यांच्या आणि बालकांच्या आरोग्याची नियमित नोंद ठेवावी. सहकारी व खासगी साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांच्या मूळ गावांची, कुटुंबप्रमुखांची आणि लाभार्थ्यांची माहिती तसेच संपर्क अधिकाऱ्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक जिल्हा कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

## गर्भवती आणि स्तनदा मातांसाठी विशेष पोषण आहार

राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी ३०४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पावसाची तूट १८.८ टक्के राहिली. दुष्काळामुळे पीक व रोजगाराचे नुकसान, पाणीटंचाई आणि स्थलांतर वाढण्याची शक्यता असून, त्याचा माता व बालकांच्या पोषणसेवांवर परिणाम होऊ नये, यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत असल्याची आयुक्त माधवी सरदेशमुख यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.तसेच, दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील प्रत्येक बालकाचे वजन व उंची डिसेंबर २०२६ पर्यंत पोषण ट्रॅकरवर नोंदविण्यात येणार आहे. आरोग्यविषयक समस्या असलेल्या तीव्र कुपोषित बालकांना पोषण पुनर्वसन केंद्रात पाठविण्यात येईल, तर मध्यम तीव्र कुपोषित बालकांचे समुदायस्तरावर व्यवस्थापन करण्यात येणार आहे. यासाठी मार्च २०२७ पर्यंतचा बालपोषण कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

दुष्काळग्रस्त भागातील प्रत्येक गर्भवती व स्तनदा मातेला अमृत आहार आणि घरपोच आहार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. गर्भवती महिलांना लोह व फॉलिक आम्लाच्या गोळ्या, चार प्रसूतीपूर्व तपासण्या आणि आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शरीर वस्तुमान निर्देशांक (बीएमआय) १८.५ पेक्षा कमी असलेल्या गर्भवती महिलांचा विशेष मागोवा घेण्यात येईल. अशा महिलांना दुप्पट घरपोच आहार देण्याचे नियोजन असून, संस्थात्मक प्रसूतीला प्राधान्य दिले जाणार आहे. गंभीर आणि मध्यम तीव्र कुपोषित बालकांना वाढीव घरपोच पोषण आहार देण्यात येणार आहे. तीन ते सहा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला अंगणवाडीत गरम शिजवलेला आहार उपलब्ध करून दिला जाईल. प्रत्येक अंगणवाडी केंद्रात ओआरएस आणि झिंकचा पुरेसा साठा ठेवणे, बालकांचे संपूर्ण लसीकरण करणे, रोटाव्हायरस लस उपलब्ध करणे तसेच स्वच्छ व उकळलेले पिण्याचे पाणी पुरविण्यावर भर देण्यात येत आहे.

# तेरणा हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिराला कळंबवाडीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कळंबवाडी : तेरणा स्पेशॅलिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या वतीने ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज आणि मोफत उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात असलेल्या कळंबवाडीत मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.**

कळंबवाडी आणि परिसरातील नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन, उपचार पद्धती आणि औषधोपचारांबाबत उपस्थित नागरिकांना माहिती दिली.

तपासणीदरम्यान गंभीर स्वरूपाच्या आजारांचे निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी नवी मुंबईतील नेरूळमध्ये असलेल्या तेरणा हॉस्पिटल येथे निःशुल्क वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

या शिबिरावेळी कृष्णा जाधव, हर्षल जाधव, पवन जाधव, पराग जाधव, समर्थ जाधव, सुयोग जाधव, दादा जाधव, राज जाधव यांच्यासह गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



"मला किडनीस्टोनचा आजार झाला होता. सोलापूर, बार्शीत उपचार घेतले. बार्शीमध्ये डाएलिसिस पण केले. त्यासाठी एक लाख रुपये खर्च केले. पण फरक पडला नाही. त्यानंतर सय्यदसरांनी मला मुंबईला नेरूळमध्ये तेरणा स्पेशॅलिटी हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी पाठवले. तीन दिवस आयसीयूत ठेवले. माझी तीन ऑपरेशन्स झाली. दरवेळी एक पैसाही खर्च करावा लागला नाही. माझ्याबरोबर माझी पत्नी होती. आम्हा दोघांची राहायची सोय, नाश्ता, जेवण तसेच माझे उपचार, गोळ्या-औषधं सगळी सुविधा पूर्ण मोफत आणि चांगली होती.

**- बाजी माटे,**
शेतकरी, भुईजे, ता. बार्शी

# दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने तरुणाला लोखंडी कड्याने मारहाण

■ जातीवाचक शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी

■ एकाविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा

**कळंब :** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एका ३० वर्षीय तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करून लोखंडी कड्याने मारहाण केल्याची घटना कळंब शहरात घडली. याप्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास कळंब येथील चोंदे देशी दारू दुकानासमोर ही घटना घडली. फिर्यादी शुभम कल्याण साळवे (वय ३०, रा. भीमनगर, कळंब) यांच्याकडे आरोपी फेरोज पाशा बागवान (रा. परळी बायपास रोड, कळंब) याने दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. पैसे न दिल्याच्या कारणावरून आरोपीने फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करून लोखंडी कड्याने मारहाण केली. या मारहाणीत शुभम साळवे जखमी झाले.

तसेच, यापुढे दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत, तर जिवे मारून टाकण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी शुभम साळवे यांनी २३ ऑक्टोबर रोजी कळंब पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून आरोपी फेरोज पाशा बागवान याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५२, ३५१(२) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(१)(आर), ३(१)(एस) आणि ३(२)(व्हीए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतकरी कर्जमुक्ती योजनेत जिल्ह्यातील आणखी १,६६१ शेतकऱ्यांना दिलासा

## आतापर्यंत जिल्ह्यातील ८३७१२ शेतकऱ्यांची नावे कर्जमुक्तीच्या यादीत

## पात्र शेतकऱ्यांनी दोन दिवसांत आधार प्रमाणीकरण करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**धाराशिव : कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून पुन्हा नव्या उमेदीने शेती करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पाचवी यादी जाहीर करण्यात आली आहे. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यस्तरावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या या यादीत एकापेक्षा जास्त बँकांमध्ये कर्जखाती असलेल्या आणि दोन लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या राज्यातील एक लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे.**



यामध्ये जिल्ह्यातील एक हजार ६६१ शेतकऱ्यांचा समावेश असून, त्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या याद्यांमध्ये एकूण ८३ हजार ७१२ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला असून, त्यापैकी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या ४९ हजार ७९४ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर ४५७ कोटी १८ लाख रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. पाचव्या यादीतील पात्र शेतकऱ्यांनी दोन दिवसांत आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

बँकांकडून घेतलेल्या पीककर्जाची परतफेड करता न आल्यामुळे राज्यातील अनेक शेतकरी थकबाकीदार झाले होते. परिणामी, त्यांना नव्याने पीककर्ज मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. एकीकडे शेतीसाठी भांडवलाची गरज आणि दुसरीकडे जुन्या कर्जाचा वाढता बोजा, अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने २ जून २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. थकीत शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरूपी मुक्त करणे आणि त्यांना पुन्हा नव्याने कर्जवाटपासाठी पात्र बनविणे, हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

या शासन निर्णयानुसार १ एप्रिल २०१९ नंतर वाटप करण्यात आलेले आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेले दोन लाख रुपयांपर्यंतचे अल्पमुदत पीककर्ज कर्जमुक्ती योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.त्याचप्रमाणे ३० सप्टेंबर २०२५ रोजी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकरकमी कर्जफेड योजना अर्थात ओटीएस लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी दोन लाख रुपयांवरील कर्जाची रक्कम ३१ मार्च २०२७ पूर्वी भरल्यास राज्य शासनाकडून दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ देण्यात येणार आहे. याशिवाय नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूदही शासन निर्णयात करण्यात आली आहे. कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभाची प्रक्रिया पारदर्शक व संगणकीकृत पद्धतीने राबविण्यासाठी महा-आयटीच्या माध्यमातून स्वतंत्र संगणकीय पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलवर संबंधित बँकांकडून थकीत अल्पमुदत पीककर्जदार शेतकऱ्यांची माहिती नोंदविण्यात आली. प्राप्त माहितीवर महा-आयटीकडून संगणकीय प्रक्रिया करून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभाची प्रक्रिया पारदर्शक व संगणकीकृत पद्धतीने राबविण्यासाठी महा-आयटीच्या माध्यमातून स्वतंत्र संगणकीय पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलवर संबंधित बँकांकडून थकीत अल्पमुदत पीककर्जदार शेतकऱ्यांची माहिती नोंदविण्यात आली. प्राप्त माहितीवर महा-आयटीकडून संगणकीय प्रक्रिया करून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत. राज्य शासनाने २२ जुलै २०२६ रोजी ५३३ शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध केली. त्यानंतर २४ जुलै रोजी १६ लाख ९६ हजार २०१ शेतकऱ्यांची दुसरी यादी,११ सप्टेंबर रोजी चार लाख १९ हजार ७३७ शेतकऱ्यांची तिसरी यादी आणि १२ ऑक्टोबर रोजी तीन लाख ५१ हजार १९२ शेतकऱ्यांची चौथी यादी प्रसिद्ध करण्यात आली. शासनाकडून पहिल्या चार याद्यांमध्ये एकूण २४ लाख ६७ हजार १३० पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचा समावेश झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर २२ ऑक्टोबर रोजी एकापेक्षा जास्त बँकांमध्ये कर्जखाती असलेल्या आणि दोन लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या एक लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांची पाचवी यादी आधार प्रमाणीकरणासाठी राज्यस्तरावर जाहीर करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यातही या योजनेची अंमलबजावणी सुरू असून, प्रसिद्ध झालेल्या याद्यांमध्ये मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या यादीत जिल्ह्यातील ४६ हजार ९१५ थकीत पीककर्जदार शेतकऱ्यांचा समावेश होता. ११ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या तिसऱ्या यादीत आणखी २१ हजार ९६६ शेतकऱ्यांची नावे जाहीर करण्यात आली. त्यानंतर १२ ऑक्टोबर रोजीच्या चौथ्या यादीत १३ हजार ७०० शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला. आता २२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या पाचव्या यादीत जिल्ह्यातील आणखी एक हजार ६६१ थकीत पीककर्जदार शेतकऱ्यांची गावनिहाय नावे प्रसिद्ध झाली आहेत. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंतच्या सर्व याद्यांमध्ये जिल्ह्यातील एकूण ८३ हजार ७१२ शेतकऱ्यांचा समावेश आहे. कर्जमुक्तीच्या या याद्या शेतकऱ्यांना सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्या विविध मोबाईल समूहांवर प्रसारित करण्यात आल्या आहेत. तसेच प्रत्येक गावातील ग्रामपंचायत कार्यालय,तलाठी कार्यालय आणि गावच्या चावडीवरही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या गावातील प्रसिद्ध यादीत नाव असल्याची खात्री करून घ्यावी. जिल्ह्यात आतापर्यंत आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या ४९ हजार ७९४ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर ४५७ कोटी १८ लाख रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. यामुळे संबंधित शेतकऱ्यांना जुन्या कर्जाच्या ओझ्यातून मुक्त होण्यास मदत झाली असून,नव्याने पीककर्ज मिळण्याच्या दृष्टीनेही दिलासा मिळणार आहे. प्रसिद्ध करण्यात आलेली पाचवी यादी ही कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांची असून, या यादीतील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे एकापेक्षा जास्त बँकांकडून पीककर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही या यादीत समावेश करण्यात आला आहे. या यादीमध्ये दर्शविण्यात आलेली कर्जथकबाकी ३१ मार्च २०२६ रोजीची असून, १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आणि इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत.त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीच्या आपल्या कर्जथकबाकीची खातरजमा करून जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रा'मध्ये जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर साखर कारखान्यांना प्रशासनाचे कडक निर्देश!



**धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करणे आणि स्थानिक ऊसतोड मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. आगामी गाळप हंगामात जिल्ह्यातील सर्व सहकारी व खासगी साखर कारखान्यांनी एकूण ऊसतोडणीपैकी किमान ६० ते ७० टक्के ऊसतोडणी मजुरांकडून करून घ्यावी, तसेच एकूण ऊस क्षेत्रापैकी ३० टक्के ऊस चाऱ्यासाठी राखीव ठेवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, धाराशिव यांनी दिले आहेत.

याशिवाय, प्रत्येक साखर कारखान्याने उत्पादित बगॅस (Bagasse) आणि मळी (Molasses) यांपैकी प्रत्येकी ३० टक्के साठा दुष्काळ निवारण, पशुधनासाठी चारा व पशुखाद्य निर्मिती यांसाठी राखीव ठेवणे आवश्यक करण्यात आले आहे. या आदेशांमुळे चारा उपलब्धतेचे नियोजन करण्यासोबतच ग्रामीण भागातील मजुरांचे संभाव्य स्थलांतर रोखण्यास मदत होणार आहे.

हार्वेस्टर यंत्राद्वारे ऊसतोडणी करताना उसाचा हिरवा पाला म्हणजे वाढा याचा चाऱ्यासाठी अपेक्षित उपयोग होण्यात अडचणी येऊ शकतात. दुसरीकडे, मजुरांनी ऊसतोडणी केल्यास पशुधनासाठी वाढ्याची उपलब्धता वाढण्यास मदत होते. तसेच स्थानिक ऊसतोड मजुरांना रोजगार मिळतो. त्यामुळे आगामी गाळप हंगामात किमान ६० ते ७० टक्के ऊसतोडणी मजुरांकडूनच करावी आणि हार्वेस्टरचा वापर मर्यादित ठेवावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### ३० टक्के ऊस चाऱ्यासाठी राखीव

जिल्ह्यातील एकूण ऊस लागवडीखालील क्षेत्रापैकी ३० टक्के ऊस जनावरांच्या चाऱ्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शक्यतो उसाच्या वाढ्याची साठवणूक कारखानास्तरावर करून दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध होईल, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे.

संभाव्य चारा छावण्या, पूरक चारा निर्मिती आणि पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रत्येक साखर कारखान्याने आपल्या एकूण बगॅस उत्पादनापैकी ३० टक्के साठा राखीव ठेवावा. जिल्हा प्रशासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय हा राखीव साठा बाहेर विक्रीसाठी किंवा अन्य कामांसाठी वापरता येणार नाही, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

दुष्काळ निवारण, पशुखाद्य निर्मिती आणि सुक्या चाऱ्यावर आवश्यक प्रक्रिया करण्यासाठी प्रत्येक साखर कारखान्याने उत्पादित मळीपैकी ३० टक्के साठा राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे पशुधनासाठी पूरक खाद्य उपलब्ध करण्याच्या नियोजनाला मदत होणार आहे. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी. केलेल्या कार्यवाहीचा साप्ताहिक अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त आणि विशेष लेखा परीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), धाराशिव यांच्याकडे सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या साखर कारखान्यांविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ तसेच इतर लागू कायदेशीर तरतुदींनुसार कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

# दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा!

- **मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांचा आंदुड येथे भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद**

**भूम :** तालुक्यातील आंदुड येथे भाजपचे जिल्हा चिटणीस तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर गीते यांच्या निवासस्थानी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी भेट दिली. यावेळी भूम तालुक्यातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांनी सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. दुष्काळाच्या संकटात सर्व कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



दुष्काळामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी आणि पशुपालकांसमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांना अन्नधान्य, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था तसेच गरजूंना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करावा.

यावेळी परिसरातील गुंडगिरीच्या मुद्द्यावरही त्यांनी भूमिका मांडली. 'कोणावर अन्याय करायचा नाही, मात्र कोणाचाही अन्याय सहन करायचा नाही,' असे स्पष्ट करत या भागात सुरू असलेल्या गुंडगिरीविरोधात कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा विश्वास त्यांनी दिला. कोणतीही अडचण आल्यास कधीही संपर्क साधावा, आम्ही सर्वजण तुमच्या सोबत आहोत, असेही ठाकूर यांनी सांगितले.

याप्रसंगी भाजपचे राज्य परिषद सदस्य बाळासाहेब क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य महादेवअप्पा आखाडे, तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर, बाबासाहेब गीते, रघुनाथ वाघमोडे, लताताई गोरे, राहुल लिमकर, राम चव्हाण, मुस्तफा पठाण, सुधाकर हाडुळे, सिद्धार्थ जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काटगावमध्ये मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी

# तेरणा हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**काटगाव :** दिवसेंदिवस आरोग्य सुविधा महाग होत असतानाच या दर्जेदार आरोग्य सेवा ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी, कष्टकऱ्यांना मोफत उपलब्ध व्हाव्यात यासाठी तेरणा स्पेशॅलिटी हॉस्पिटलच्या वतीने नुकतेच तुळजापूर तालुक्यातील काटगाव येथे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात मुंबईतील नेरूळच्या तेरणा स्पेशॅलिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. या वेळी या तज्ज्ञांनी विविध उपचार पद्धती तसेच औषधोपचारांबाबतही माहिती दिली. काटगाव आणि परिसरातल्या नागरिकांनी या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि तपासणी करून घेतली. औषधेही घेतली.

तपासणीत गंभीर स्वरूपाच्या आजारांचे निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी मुंबईतील नेरूळच्या तेरणा हॉस्पिटलमध्ये निःशुल्क वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती या वेळी हॉस्पिटलच्या वतीने देण्यात आली. या वेळी जिल्हा परिषद सदस्य निवृत्ती म्हेत्रे, पंचायत समिती सदस्य बालाजी शिंदे, सरपंच अशोक माळी, मा.जि.प. सदस्य चंनवीर भेटकर, राम जवान, खंडू पावले, बाबा भेटकर, सुधाकर हजारे, तुकाराम माळी, महेश माळी, राहुल नकाते, श्रीषल माळी, इस्माईल घाटवाले, नागनाथ भेटकर यांच्यासह गावकरीही उपस्थित होते.



# एन. व्ही. पी. शुगरची कामगारांना दिवाळीची मोठी भेट!

- **कायम कर्मचाऱ्यांना महिन्याचा पगार बोनस**
- **कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील महिलांना साडी-चोळी अनब मिठाईचे वाटप होणार**

**धाराशिव :** दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह, आपुलकी आणि गोडव्याचा उत्सव! याच सणाच्या पार्श्वभूमीवर एन. व्ही. पी. शुगर प्रा. लि., जागजी कारखाना व्यवस्थापनाने अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांसाठी दिवाळीची आनंदवार्ता जाहीर केली आहे. सन २०२६ च्या दिवाळी सणानिमित्त कारखान्यातील कायम कर्मचाऱ्यांना एका महिन्याच्या म्हणजेच ३० दिवसांच्या पगाराइतका बोनस, तर चालू हंगामात नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना १५ दिवसांच्या पगाराइतका बोनस देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील महिलांना साडी-चोळी आणि दिवाळी मिठाईची भेटही देण्यात येणार असल्याने कामगारांच्या आनंदात आणखी भर पडणार आहे.

कारखान्याच्या प्रगतीमध्ये अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. उत्पादन प्रक्रिया सुरळीत ठेवण्यापासून ते कारखान्याच्या दैनंदिन कामकाजापर्यंत प्रत्येक स्तरावर कर्मचारी आणि कामगार मेहनत घेत असतात. त्यांच्या कष्टामुळे आणि सहकार्यामुळे कारखान्याच्या प्रगतीला हातभार लागतो. या मेहनतीची दखल घेऊन कामगारांना दिवाळीचा सण आनंदात साजरा करता यावा, या उद्देशाने एन. व्ही. पी. शुगर व्यवस्थापनाने बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे.

व्यवस्थापनाने जाहीर केलेल्या निर्णयानुसार, कारखान्यातील कायम कर्मचाऱ्यांना एक महिन्याच्या म्हणजेच ३० दिवसांच्या पूर्ण पगाराइतकी बोनसची रक्कम अदा करण्यात येणार आहे. तसेच, चालू हंगामात नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार असून, त्यांना १५ दिवसांच्या पगाराइतका बोनस दिला जाणार आहे. त्यामुळे जुन्या आणि नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांनाही दिवाळी सणाच्या आनंदात सहभागी होता येणार आहे.दिवाळीच्या काळात घरातील विविध गरजा, सणाची खरेदी, मुलांचे कपडे, फराळ आणि इतर खर्च वाढतात. अशा वेळी बोनसची रक्कम कर्मचाऱ्यांना आर्थिक आधार देणारी ठरू शकते. त्यामुळे व्यवस्थापनाच्या या निर्णयाकडे कामगारांच्या मेहनतीचा सन्मान आणि त्यांच्या आनंदात सहभागी होण्याच्या दृष्टीने पाहिले जात आहे. एन. व्ही. पी. शुगर व्यवस्थापनाने बोनस वितरणाबरोबरच महिला सक्षमीकरणालाही महत्त्व दिले आहे. कर्मचाऱ्यांच्या बोनसची रक्कम त्यांच्या कुटुंबातील महिला प्रतिनिधीच्या स्वतःच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यात येणार आहे. कुटुंबातील महिलांचा आर्थिक सहभाग वाढविणे आणि त्यांना आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक सक्रिय भूमिका मिळावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

याशिवाय, कर्मचाऱ्यांच्या घरातील महिला प्रतिनिधींना साडी-चोळी आणि दिवाळी मिठाईची भेट देण्यात येणार आहे. दिवाळीच्या आनंदात कुटुंबातील महिलांचाही सन्मानपूर्वक सहभाग असावा, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कामगारांच्या कुटुंबाचा विचार करून घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे दिवाळीचा आनंद घराघरांत पोहोचण्यास मदत होणार आहे. बोनसची रक्कम संबंधित महिला प्रतिनिधींच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आपल्या घरातील महिला प्रतिनिधीचे आधार कार्ड आणि बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत किंवा रद्द केलेला धनादेश (Cancelled Cheque) कारखान्याच्या कार्यालयीन विभागात जमा करणे आवश्यक आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी ही कागदपत्रे येत्या दोन दिवसांत जमा करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तरुणांनी अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनावे : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई : अमली पदार्थांचे व्यसन ही समाजापुढील, विशेषतः तरुण पिढीसमोरील गंभीर समस्या आहे. अमली पदार्थांचा पुरवठा रोखण्याबरोबरच त्यांची मागणी कमी करण्यासाठी जनजागृती, प्रतिबंध, पुनर्वसन आणि व्यसनाधीन व्यक्तींना आधार देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने अमली पदार्थमुक्त भारताचे राजदूत बनून जनजागृती, प्रतिबंध आणि पुनर्वसनावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.**

## राष्ट्रीय एकता दिनानिमित्त पोलीस दलांच्या राष्ट्रीय मोटारसायकल रॅलीचा शुभारंभ




सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या राष्ट्रीय एकता दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'नशामुक्त भारत - फाईट अगेन्स्ट ड्रग्ज' या राष्ट्रीय मोटारसायकल रॅलीच्या शुभारंभप्रसंगी राज्यपाल बोलत होते. नरीमन पॉईंट येथे झालेल्या या कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महापौर रितू तावडे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे आणि राज्य राखीव पोलीस बलाचे अपर पोलीस महासंचालक राजकुमार व्हटकर यांच्यासह विविध राज्यांतील पोलीस अधिकारी,कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मोटारसायकल रॅलीला गुजरातकडे प्रस्थान देण्यात आले. विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील पोलीस दलांचे प्रतिनिधी तसेच केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अधिकारी व जवान या रॅलीत सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याबरोबरच तरुणांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे हा या रॅलीचा उद्देश आहे. ही रॅली गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे पोहोचणार आहे.

- **राष्ट्रीय एकात्मतेच्या रक्षणासाठी सदैव सतर्क राहणे आवश्यक**

राज्यपाल वर्मा म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांनी विविध संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण घडवून आणण्यात ऐतिहासिक आणि निर्णायक भूमिका बजावली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे सशक्त आणि एकसंध भारताचा पाया घातला गेला. राष्ट्रीय एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी आपण सदैव सतर्क राहिले पाहिजे.

महाराष्ट्र पोलीस दल आपली कार्यकुशलता, समर्पण आणि उत्कृष्ट सेवेसाठी देशभरात ओळखले जाते. राज्यात शांतता, सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याबरोबरच सुरक्षित व उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यात पोलिसांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

गडचिरोलीतील नक्षलवादी कारवाया नियंत्रणातही महाराष्ट्र पोलिसांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गडचिरोली जिल्हा आता महत्त्वाचे पोलाद केंद्र म्हणून उदयास येत असून, तेथे विकासाच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

- **अमली पदार्थांचा पुरवठा रोखण्यासोबत मागणी कमी करण्यावरही भर द्यावा**

अमली पदार्थांच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी त्यांचा पुरवठा रोखण्याबरोबरच मागणी कमी करण्यावरही लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. अमली पदार्थांची तस्करी रोखणे तसेच तस्कर आणि विक्रेत्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई करणे ही जबाबदारी पोलीस आणि अमली पदार्थविरोधी यंत्रणांची आहे. मात्र, अमली पदार्थांची मागणी कमी करण्यासाठी संपूर्ण समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना, पुनर्वसन आणि व्यसनाधीन व्यक्तींना आधार देणे आवश्यक असल्याचे सांगत राज्यपाल वर्मा यांनी अमली पदार्थ विरोधी कृतीदलाच्या कारवायांबाबत समाधान व्यक्त केले.